# वार्षिक अहवाल २००७-०८

२८ फेब्रुवारी २००७ रोजीसंस्थेचे कार्याध्यक्ष कै.अरुअप्पा जोशी यांचे दु :खद निधन झाले.संस्थेचा आधारवृक्ष हरपला असे आम्हांला वाटले.कै.अरुअप्पा जोशी यांना कृतज्ञतापूर्वक श्रध्दांजली अर्पण करते.

रा.भा.शिर्के प्रशालेच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्रशालेचा अहवालसादर करीत आहे.

आमची रा.भा.शिर्के प्रशाला हीरतनागिरी जिल्हयातील एक अग्रगण्य शाळा आहे असे म्हणताना खरोखरच आनंद आणि अभिमान वाटतो.सन २००७-०८ या सालातहीवार्षिक अहवालसादर करतानासानेगुरुजीगुणवत्ता अभियानात जिल्हास्तरावरहीविशेषगुणवत्ता प्राप्त केली आहे.प्रशालेबरोबरच संस्थेने केलेले सक्रीय मार्गदर्शन यामुळे हे यश प्राप्त झाले. प्रशालेची विद्यार्थी संख्या १५१८ असून तुकडया आहेत.

१. मार्च २००७ मध्ये झालेल्या एस.एस.सी.परीक्षेचा निकाल ९४.६९% इतकालागला.विशेष योग्यता श्रेणीत ४४,प्रथम श्रेणीत ८८,व्दितीय श्रेणी ११८ तर ६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातील विद्यार्थिनी कु.मानसी श्रीकांत पटवर्धन ही ९१.०७% गुण मिळवून प्रथम,कु.नीरजा विजयानंद जोशी ९०.७६% गुण मिळवून व्दितीय तर कु.चैताली अशोक साटम ९०.३०% मिळवून विद्यालयात तिसरी आली.

२. माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ७ विद्यार्थ्यांनी गुणवत्ताश्रेणी मिळवली.कु.अंकिता अनंतखर्डेहिने जिल्हयात २ रा तर राज्यात १६ वा क्रमांक प्राप्त केला.

३. महाराष्ट्र राज्यभाषा सभा पुणे यांच्या बालबोधिनी ,प्राथमिक प्रवेशिका ,सुबोध या परीक्षांना १७० विद्यार्थी प्रविष्ठ झाले.या परीक्षांचा निकाल ९४.२५% इतकालागला.

४. टिळक महाविद्यालयातर्फे घेण्यांत आलेल्या परीक्षेत १२० विद्यार्थी प्रविष्ठ झाले.अनेक विद्यार्थ्यांनी विशेषगुणवत्ता प्राप्त केली.

५. गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यांत आलेल्या प्राविण्य परीक्षेत इ.८वीचे ३ तर ,इ.५ वीच्या एका विद्यार्थ्याने उज्ज्वल यश प्राप्त केले.

६. मराठा मंदिर महा.ज्ञानपीठ संस्कृत पाठांतर,प्रथमा,व्दितीया,तृतीया या परीक्षा घेतल्या जातात.या परीक्षेला १०० विद्यार्थी प्रविष्ठ झाले. परीक्षेचा निकाल १००% लागला.

७. विज्ञान विभागात तालुकावजिल्हाविज्ञान मेळाव्यात वक्तृत्व स्पर्धेत तसेचविज्ञान प्रदर्शनात सोलर प्रोजेक्ट हे उपकरण तयार करुनसादर केले. प्रयोगशाळा सहाय्यक श्री.विजापुरे सर यांनीही सोलर कुकर तयार करुनसादर केला.

विज्ञान विषयक प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

राजीवगांधी अक्षय ऊर्जादिवस निमित्त निबंध स्पर्धेत कु.गौरव मकरंद पिलणकर यास जिल्हास्तरावरव्दितीय क्रमांक प्राप्त झाला.

माध्य.शिक्षण विभाग आयोजित जागतिक तापमानात होणारीवाढ व पर्यावरण संतुलन या निबंध स्पर्धेत २ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद या परीक्षेसाठी १० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाली तर ४ विद्यार्थ्यांना राज्य स्तरावरील परीक्षेसाठी निवड झाली.

विज्ञान मंच योजना - ६ विद्यार्थ्यांची शिबिरासाठीनिवड झाली.

८. महाराष्ट्र ज्ञानपीठ गणित परीक्षा दुसरीचानिकाल १००% लागला.कु.मृणाल शंकर ढोलेहिला १०० पैकी ९६ गुण मिळाले व ती राज्यात दुसरी आली.

९. कोकण प्रज्ञा परीक्षेसाठी १३८ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेज.महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेसाठी इ.८वीचे ३३ तर इ.९ वीचे १४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

१०. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री.सोसा.आणिगोगटे कॉलेज आयोजित चित्र स्पर्धेत प्रथम गटात कु.तेजस्विनीराधाकृष्ण प्रभुदेसाई हिने प्राप्त केला. सामाजिक वनीकरण विभाग आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत इ.४ थी ते ५ वी या गटात कु.सुरज विजय घवाळी याने प्रथम तर कु.मधुरा मिनाल नाखरेकरहिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.इ.८वी ते १० वी या गटात कु.मंजिरी राजीवपिलणकर हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

रत्नागिरी तालुका कलाध्यापक संघ आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत इ.७ वी ते ८ वीगटात कु.मंजिरी राजीव पिलणकर हिने प्रथम क्रमांक आणिइ.९वी ते १० वी या गटात कु.सिध्दार्थ मिलिंद पिलणकर याने दुसरा क्रमांक मिळविला.

शासकीय बालचित्रकला स्पर्धा,वन्यजीव सप्ताह आयोजित चित्रकला स्पर्धा,डाक खात्याच्या म.गांधींच्या जीवनावर स्टॅम्प डिझाइन स्पर्धा,सकाळ पेपर्स आयोजित स्पर्धा इ. विविध स्पर्धेत अनेक विद्यार्थी सहभागी होतात.

११. विद्यालयातील क्रीडा विभागही अत्यंत सक्षम असूनविविध स्पर्धात विद्यार्थ्यांचा सहभाग व उल्लेखनीय यश म्हणजे विद्यालयाच्या यशातील मानाचा शिरपेच आहे.

फुटबॉल,व्हॉलीबॉल,खो-खो,बॅडमिंटन,क्रिकेट,कुस्ती,बुध्दीबळ,कॅरम,कबडडी आणि मैदानी स्पर्धेत विद्यालयाचे संघ सहभागी झालेहोते.

सन २००७-०८ या वर्षात राष्ट्रीय स्तरावर कॅरमसाठी कु.मैत्रेयी राजनगोगटेव अभिषेक चव्हाणव बॅडमिंटनसाठी कु.स्नेहल राजाराम सावंत यांची निवड झाली.

राज्यस्तरीय स्पर्धेत बॅउमिंटनसाठी मानसी सुर्वे,प्रषिता घळसासीवश्रुतीसाखळकर यांची निवड झाली.

इतर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये खो-खोसाठी कु.आदित्य साळुंखे,कु.पुष्क्राज सावंत,कु.आकिब मुकादम,बुध्दीबळासाठी कु.राहुलटिकेकर,कबडडीमध्ये कु.नीलम चव्हाण,तलवारबाजीसाठी कु.कमलेश बिन्नरव कॉर्फबॉलसाठी कु.विद्या विचारे यांची निवड झाली.

१२. शालेय ,आंतरशालेय,तालुका,जिल्हा स्तरावर अनेक विद्यार्थी हस्ताक्षर,निबंध ,नाटयवाचन ,अभंग,गीतगायन,कथाकथन,पाठांतर,पठन स्पर्धेत विद्यार्थी सहभागी होतात.

महा.ज्ञान मंडळ मर्यादित संस्था आयोजित महा.ऑलिम्पियांड अभियानात २ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

महारष्ट्र छात्रसेनेत इ.८वी मधून ११४ तर इ.९वी मधून १०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. एकूण ५० विद्यार्थी नेव्हल एन.सी.सी.चे प्रशिक्षण घेत आहेत.ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्पमध्ये ओव्हर बेस्ट कॅडेट म्हणून कु. मानस पवारची निवड झाली.दि.९ डिसेंबररोजी पार पडलेल्या परेडचे संचलन नेतृत्व ऑफिसर सी.एस.पाटील यांनी केले.

विद्यालयातस्काऊट गाईड विभाग उत्तमरित्या कार्यरत आहे.यावर्षी सौ.कानविंदे मॅडम निवृत्त झाल्यामुळे सौ.श्वेता कांबळे यांची गाईड शिक्षिका म्हणून निवड झाली.श्री.देवळेकरसरांचीस्काऊट गाईड जिल्हासंस्थेचेसेक्रेटरी म्हणून चौथ्यांदा बिनविरोधनिवड झाली आहे.तसेच मुख्याध्यापक श्री.कांबळेसरांची मुख्यालय आयुक्त म्हणून निवड झाली आहेही आमच्या शाळेस गौरवास्पद गोष्ट आहे.

हरितसेनेच्यावतीने ओझोनदिन,वृक्षारोपण कार्यक्रम केले जातात.

स्वराज्य सभा विभागातर्फे निवडणूक,गुरुपौर्णिमा,लो.टिळक पुण्यतिथी,महात्मा गांधीवलाल बहादूरशास्त्री जयंती,रक्षाबधंन,संस्कृत दिन,ओझोनदिन इ. विशेष कार्यक्रमांचे नियोजन केले जाते.सांस्कृतिक विभागाचे संपूर्ण सहकार्य असते.

विद्यालयाच्यावतीनेविकासहस्तलिखित तयार केले जाते.लेखन,पुनर्लेखन,मांडणीयासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थी सहभागी होतात.

प्रयोग शाळा,ग्रंथालय,दृकश्राव्य साधने इ. चा विद्यार्थी मोठया प्रमाणावर लाभ घेतात.ग्रंथालयासाठी विद्यार्थी वशिक्षक यासाठी सहकार्य करतात.

शिक्षकपालक संघाच्यावतीने पालक सभा घेतल्या जातात.पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी श्री.विवेकघळसासी यांचे व्याख्यान आयोजित करण्यांत आले.

गोवा,औरंगाबाद,गंधर्व पार्क,कोल्हापूर,वारणानगर,दापोली आजर्ले,कृषी विद्यापीठइ.ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यांत आले.

सन २००८-०९ हेवर्ष रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे अमृत महोत्सवी वर्ष तरशिर्के प्रशालेचे हीरक महोत्सवी वर्ष आहे.याचा उद्‌घाटन समारंभ दि.०९ ऑगस्ट २००७ रोजी संपन्न झाला.याच निमित्ताने दि.२३ डिसेंबर २००७ रोजी माजी विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित करण्यांत आला होता.त्याप्रसंगी निवृत्त मुख्याध्यापक श्री.ठाकूरदेसाईव अन्य निवृत्त शिक्षकवसंस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

अहवालवर्षात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.एस.एम.कांबळे यांची सानेगुरुजीआदर्श पुरस्कार २००७ साठीनिवड झाली.विद्यालयातील सहा.शिक्षकवसंस्थेचे सहकार्यवाह श्री.एन.टी.देवळेकर यांना राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप २००७ (अखिल महा.पत्रकार व पत्रलेखन संघ,मुंबई यांच्यावतीने ) वश्री.साईसेवा मित्र मंडळ,नाचणे यांच्यावतीने कै.अरुअप्पा जोशी स्मृतीप्रित्यर्थ श्री.साई ज्ञानदिप पुरस्कार २००७ देऊन गौरव करण्यांत आला या सन्माननीय पुरस्कारांबद्‌दल व यशस्वी विद्यार्थ्याच्या सुयशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यांत आले. आम्हां शिर्के प्रशाला परीवाराच्या दृष्टीनेहीनिश्चितच आनंदाचीगोष्ट आहे.

- सौ. वृंदागांधी (पर्यवेक्षिका )